# जिल्हा परिषद, नंदुरबार
(सामान्य प्रशासन विभाग)

Email-dyceogadnbr@gmail.com नवीन प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टोकरतलाव रोड, नंदुरबार-४२५४१२ फोन क्र.०२५६४-२१०२४१

**वाचा** :- 1. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/ कार्यासन 2012 मंत्रालय, मुंबई दि 01/08/2019.

2. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी 2018/ प्र.क्र. 366/16-ब मंत्रालय मुंबई दि 07 मे2021.
3. या कार्यालयाकडील ज्ञापन क्रं.जिपनं/साप्रवि/आस्था-1अ/376/2021 दि.02/08/2024
4. या कार्यालयाची मंजुर टिपणी दि.23/08/2024

**जा.क्र.जिपन/साप्रवि/आस्था-1अ/455/2024** **नंदुरबार दि.23/08/2024**

**ज्ञापन**

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. 1 अन्वये राज्य शासकिय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबत मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यांत आली आहेत. तसेच संदर्भ क्र. 2 अन्वये विशेष अनुमती याचिका क्र. 28306/2017 मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे सेवा जेष्ठतेनुसार भरण्याबाबत शासन धोरण निश्चीत करण्यांत आले आहे.

त्यानुसार मा. उच्च न्यायालय, मुबई यांनी याचिका क्र. 2797/2015 या प्रकरणी दि. 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा. सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवा जेष्ठतेने भरण्याबाबत धोरण निश्चीत केल्याने संदर्भ क्र. 2 च्या शासन निर्णयांत नमुद अ.क्र. 3 चा (अ) व (ब) नुसार **वरिष्ठ सहाय्यक(मंत्रा.)** संवर्गात पदोन्नती देणे कामी विचार क्षेत्रातील कर्मचा-यांची यादी संदर्भ क्रं.3 अन्वये ज्ञापनासोबत जोडुन प्रसिध्द करण्यांत येवून सदर यादीबाबत संबधीत कर्मचा-यांच्या आक्षेप / हरकती मागविण्यांत आले होते. सदर प्राप्त आक्षेप / हरकतींची पडताळणी करुन नियमानुसार योग्य हरकतीनुसार बदल करण्यांत येऊन सबब यापुढे कोणत्याही कर्मचा-यांची हरकत नाही असे गृहीत धरुन या ज्ञापनासोबत **वरिष्ठ सहाय्यक(मंत्रा.)** संवर्गात पदोन्नती देणे कामी विचार क्षेत्रातील कर्मचा-यांची अंतीम यादी प्रसिध्द करण्यांत येत आहे. प्रस्तुत सुचीची एक प्रत आपल्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यांत येवून त्याची पोहच दप्तरी ठेवावी.

सदरची यादी जिल्हा परिषद नंदुरबार कार्यालयाच्या www.zpndbr.in या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यांत आली आहे.

Signed by Pandurang
Sakharam Kolhe
Date: 24-08-2024 16:16:43

**(पी.एस.कोल्हे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.)**
**जिल्हा परिषद नंदुरबार**

**प्रत. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांना माहितीसाठी सविनय सादर.**
**प्रत. ------------------------------------------- खाते प्रमुख(सर्व) जि.प.नंदुरबार**
**प्रत. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, -------------------------- (सर्व) जि. नंदुरबार**